करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

वर्ष 34 वे

| www.saptahiksandesh.com |

संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे

वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०








रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.४६ | पाने-१६ | दि.२९/११/२०२४ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत - ४ रू.







# मतदारांचा विश्वास सार्थ करणार

## विकास हा कागदावर नाहीतर प्रत्यक्षात दाखवणार : नूतन आमदार नारायण आबा पाटील

करमाळा : करमाळा मतदार संघातील मतदारांनी माझ्यावरती विश्वास ठेवून प्रचंड बहुमताने मला निवडून दिले आहे. या मतदारांचा मी विश्वास सार्थ करणार आहे. विकास हा काय असतो, हा कागदावर न दाखवता प्रत्यक्षात दाखवणार आहे व मतदारांचे मत सार्थकी लावणार आहे; असे नूतन आमदार नारायण आबा पाटील यांनी सांगितले.

विजयानंतर ते सा.कमलाभवानी संदेशशी बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, की सन २०१४ ते २०१९ या कालावधीत मतदारांनी मला आमदार म्हणून सेवा करण्याची संधी दिली. त्यावेळी मी रात्रंदिवस काम करून वेगवेगळ्या क्षेत्रात प्रगती केली आहे. यामध्ये दहिगाव उपसासिंचन योजना कार्यान्वीत केली असून, कुकडीचे पाणी करमाळा तालुक्यात आणण्याचा प्रयत्न केला आहे. तालुक्यातील अनेक रस्ते परिपूर्ण केले आहेत. वीजेचे प्रश्न व आरोग्याचे प्रश्न सोडविले आहेत.

त्यानंतर सन २०१९ ला माढा तालुक्यातील मतदारांचे पाठबळ न मिळाल्याने मला अपयशाचा सामना करावा लागला. त्यानंतरही मी जनतेचा आमदार (पान ४ वर)



आमदार म्हणून सत्तेत असताना अनेक कामे केली आहेत. तरीही तालुक्यातील अनेक समस्या आहेत. यामध्ये रिटेवाडी उपसासिंचन योजना, दहिगाव उपसासिंचन योजनेचे शेतकऱ्यांच्या शेतात पाणी सोडणे, राजर्षी शाहू महाराज अद्ययावत रूग्णालय उभारणे, पुनर्वसन भागातील समस्या सोडविणे, करमाळा एम.आय.डी.सी. सुरू करणे, मांगी तलावात कुकडीचे पाणी कायमस्वरूपी सोडणे, तंत्रज्ञान व वैद्यकिय शिक्षण सेवा सुरू करणे, पूर्ण दाबाने वीज देणे तसेच गावोगाव शुध्द पिण्याचे पाणी पुरविणे असे अनेक उपक्रम राबवायचे आहेत. ते मी प्राधान्याने राबविलच. याशिवाय गटातटाचा विचार न करता येईल त्या नागरीकांचे आपण काम करणार आहोत. त्यामुळे विरोधी गटाच्या कार्यकर्त्यांनीही कोणताही किंतू मनात न ठेवता समक्ष येऊन भेटून काम करून जावे.

...नारायण आबा पाटील (नूतन आमदार, करमाळा मतदार संघ)




मिळालेल्या संधीचे सोने केल्याशिवाय भविष्य नसते आणि समाजात सन्मानही नसतो.

**संपादकीय.........................................!**

# नूतन आमदार पाटील यांच्या समोर आव्हाने

विधानसभा निवडणुकीत मतमोजणीला नेहमीच आघाडी इकडून तिकडे गेलेली दिसते. सन २०२४ च्या निवडणुकीत पहिल्या फेरीपासून १७ व्या फेरी पर्यंत नारायण आबा पाटील यांना आघाडी वाढत गेली. सतराव्या फेरीला जवळपास ३३ हजारापेक्षा जास्त आघाडी मिळाली होती. विशेष म्हणजे हीच आघाडी यशासाठी पाटील यांना उपयुक्त ठरली. करमाळा विधानसभा मतदार संघ हा एकमेव मतदार संघ असा आहे, की शेवटच्या क्षणापर्यंत कोण निवडून येईल हे सांगता येत नाही. सन २०१४ आणि २०१९ ला हे चित्र संपुर्ण मतदारसंघाने अनुभवले.यावेळी तसे झाले नाही. तालुक्यातील १७ फेऱ्या तर आघाडीच्या गेल्या पण त्यानंतर शेवटच्या आठ फेऱ्यातही फारसे चित्र बदलले नाही. त्यामुळे संजयमामा यांचा दारूण पराभव झाला.



नारायण आबा पाटील या एका जिद्दी व धडपड्या प्रतिनिधीकडे आमदारकी आली आहे. सर्व सामान्य परिवारातील प्रतिनिधीकडे जनतेने पुन्हा एकदा हे सन्मानाचे व कर्तृत्वाचे पद दिले आहे. ना मोठा घराणा, ना मोठे शिक्षण, ना मोठ्या संपत्तीचा वारसा ना साखर कारखानदारीचे वलय, वलय होते ते सर्वसामान्य कार्यकर्त्यांचे. विशेष म्हणजे त्याच जोरावर त्यांना हे यश मिळाले आहे. माजी आमदार जयवंतराव जगताप, करमाळा शहरातील सावंत गटाचे व मोहिते-पाटील गटाचे मिळालेले पाठबळ आणि पाटील गटाची असलेली भक्कम साथ यामुळे आबा यांना ही पुन्हा एकदा दुर्मिळ अशी संधी मिळाली आहे. त्यामुळे मिळालेल्या संधीचं सोनं करणं हे आता नारायण आबांच्या हातात आहे. या तालुक्यातील मतदार तसा हुशार आहे, चाणक्ष आहे. संधी देण्याबाबत तो कधीही मागे रहात नाही; पण संधी देवूनही काहीच केले नाहीतर तो घरपोहोच करायला मागेपुढे पाहात नाही आणि काम करणाऱ्याला भरभरून मतदान केल्याशिवाय रहात नाही. यावेळी आबांना जे झाले मतदान त्यातून स्पष्ट झाले.

मुळातच हा तालुका विकासाच्या किनाऱ्यावर येऊन ठेपलेला आहे. आमदार पाटील यांच्या दृष्टीने ती बाब अत्यंत महत्वाची आहे. पाडाला आलेले फळ चाखायला वेळ लागत नाही. याप्रमाणे तालुक्यातली बहुतेक कामे पाडाला आलेली आहेत. दहीगाव उपसा सिंचन योजनेचे काम झाले पण उपचाऱ्या नाहीत. थोडा जोर दिला तर ते काम लवकर पूर्ण होऊ शकते, शेतकऱ्याच्या बांधापर्यंत आलेले पाणी शेतात गेलेतर त्याचे श्रेय अर्थातच आबांना जाणार आहे.कुकडीचे पाणी टेल टू हेड दिले जात नाही. काही चाऱ्या व उपचाऱ्याची कामे राहिली आहेत. ती कामे करून घ्यावी लागणार आहेत पण त्यापेक्षा या तालुक्यात पाणी आणणे हे खमक्या माणसाचे काम आहे. पुर्वी डिगामामांनी व नारायण आबांनीच आणले होते. कुकडीचे पाणी मांगी,राजुरी, वीट, कुंभेज या तलावात पुरेपूर मिळाले तर खुप मोठे काम होऊ शकते. तालुक्यामध्ये वीजेचा अजुनही प्रश्न आहे. काही उपकेंद्रांची गरज आहे. त्यासाठी वरीष्ट पातळीवर लढावे लागणार आहे. याशिवाय सौरउर्जेवरील पंपाला प्राधान्य द्यावे लागणार आहे.

तालुक्यातील अनेक रस्ते आबांच्या कारकिर्दीत झाले पण काही रस्ते अजुनही होण्याची गरज आहे. त्यासाठी प्रयत्न व पाठपुरावा करावा लागणार आहे. त्याशिवाय तालुक्यातील रस्त्याची स्थिती सुधारणार नाही. पुर्नवसन भागातील गावातील रस्ते दुरूस्तीसाठी विशेष व वेगळे प्रयत्न करावे लागणार आहेत. तालुक्यातील पाणी पुरवठा योजना वीज बिल, कर्मचारी पगार यामुळे बंद पडल्या आहेत. दुष्काळात शासन चालवते नंतर त्या योजना बंद असतात, त्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. या बरोबरच रूग्णासाठी अद्यायावत रूग्णालय आवश्यक आहे. तसेच या तालुक्यात तंत्रज्ञान व उच्च शिक्षण , वैद्यकिय शिक्षण सुविधा नाहीतच, त्यासाठी तालुक्यातील मुलांना बाहेर जावे लागते. शिक्षणासाठी वेगळे प्रयत्न करण्याची गरज आहे.गेल्या २७ वर्षापासून करमाळा एम.आय.डी.सी.चे काम रेंगाळले आहे. फार काही नाही पण संबंधित आधिकाऱ्याच्या मागे लागलेतर व नवीन उद्योजकांना आमंत्रित केलेतर तालुक्याचे हे स्वप्न पुर्ण होऊ शकते. त्यामधून बेरोजगारांच्या हाताला काम मिळू शकते, पण त्याकडे आमदार विशेष लक्ष देत नाहीत. ते काम आबांना करावे लागणार आहे.

गेल्या पाच वर्षात अधिकृत आमसभा झाली नाही.सरकार स्थापन झाल्यावर आमसभा घ्यावी लागेल व सर्वसामान्यांना मुक्तपणे बोलण्याची संधी द्यावी लागेल. कोळगाव प्रकल्पाची राहिलेली कामे, सहकार क्षेत्रातील कामे,अशी अनेक कामे असलीतरी काही महत्वाच्या कामावर लक्ष देण्याची गरज आहे. जेऊर ते टेंभूर्णी पट्ट्यात शेतीपुरक औद्योगिक वसाहत उभारण्याची गरज आहे. या भागात केळी, लिंबू, पपई अशी फळझाडाची शेती होते, यावर प्रक्रिया करणारे उद्योग उभे करण्याची गरज आहे. तालुक्यात चार साखर काररखाने आहेत पण यावर्षी एकही कारखाना सुरू नाही. लाखो टन ऊस हा बाहेरच्या कारखान्यांना द्यावा लागणार आहे. बाहेरचे कारखाने त्याना गरज असेलतरच सन्मानाने ऊस नेतात नाहीतर शेतकऱ्यांना अक्षरश: रडकुंडीला आणतात. हीबाब लक्षात घेऊन तालुक्याचे लोकप्रतिनिधी म्हणून राजकारण बाजुला ठेवून तालुक्याचे साखर कारखाने सुरू करण्यासाठी त्यांना सर्वतोपरी मदत करावी लागणार आहे. उजनी भागात पर्यटनाला मोठी संधी आहे. त्यासाठी पर्यटन केंद्र उभारण्यासाठी योग्य नियोजन करावे लागणार आहे. महिलांसाठी एकही मोठा उद्योग नाही. तालुक्यात शेकडो बचतगट आहेत पण अपवाद वगळता यशस्वी बचत गट नाहीत. या गटांना आधार देवून मोठे काम करण्याची गरज आहे.

सर्वात महत्वाचे म्हणजे प्रशासकीय अधिकारी सर्वसामान्यांना अक्षरश: चिरडतात. ते मुजोर झाले आहेत. त्यांना आपण जनतेचे नोकर आहोत याची आठवण करून देण्याची गरज आहे. ते काम तात्काळ आबांना करावे लागणार आहे. तालुक्यातील गवापातळीवरचे रस्ते, पाईप लाईन आडवण्याचे प्रकार मोठे आहेत. त्याकडेसुध्दा लक्ष देण्याची गरज आहे. अशा स्वरूपाची कामे जर आबांनी केलीतर आबांची कारकिर्द तालुकावासीय कधीही विसरू शकणार नाहीत व पुन्हा निवडणुकीसाठी त्यांना मतदार धावपळही करू देणार नाहीत. त्यांच्या वाटचालीसाठी शुभेच्छा...!

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)


पुन्हा आपलं सरकार
मुख्यमंत्री साहेब
जितेश रणजीत कटारिया
सरचिटणीस भाजपा करमाळा

पान १ वरून पुढे...

# मतदारांचा विश्वास सार्थ करणार : आ.नारायण पाटील

म्हणूनच पाच वर्ष हाती येईल ते काम करत राहिलो. गावागावातील कार्यकर्त्यांशी संपर्क ठेवून होतो. महत्वाच्या कामासाठी सरकार दरबारी जावून विनंती करून कामे करत होतो. ही बाब लक्षात घेऊन करमाळा तालुक्यातीलच नव्हेतर माढा तालुक्यातील मतदारांनीही पाठबळ दिले. त्यामुळे १७ हजारहून अधिक मतांनी मला यश मिळाले आहे. ही बाब लक्षात ठेवून यापुढेही रात्रंदिवस मतदार संघातील विकासासाठी प्रयत्न करणार आहे.

## संत गजानन महाराज मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त

# २१ ते २७ डिसेंबर श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा



करमाळा(सं.प्र.): करमाळा येथील संत गजानन महाराज मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त करमाळा येथे श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा भागवताचार्य अनुराधा दिदी यांच्या पावन वाणीमध्ये २१ ते २७ डिसेंबर या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आला आहे. करमाळा शहर व तालुक्यामध्ये कोरोनानंतर बऱ्याच वर्षांनी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यात नागरीकांनी सहभागी होऊन याचा लाभ घ्यावा; असे आवाहन संत गजानन महाराज मंदिराच्या कुरूलकर मॅडम यांनी केले आहे.

भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा मोठ्या प्रमाणात सादर होणार असून या कार्यक्रमाचे यशस्वी संयोजन करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते श्रेणिकशेठ खाटेर यांनी २७ नोव्हेंबर रोजी आपल्या वाढदिवसानिमित्त ५१ हजार रुपये देणगी जाहीर केली असून त्यांना श्रीमद् भागवत कथेचे यजमान पद देण्यात आले आहे. श्रेणिकशेठ खाटेर यांनी यजमान पद घेतल्यानंतर संत गजानन महाराज मंदिर समितीच्या वतीने त्यांचा सत्कार कुरूलकर मॅडम, प्रदीप देवी यांचे हस्ते करण्यात आला. भागवत ज्ञानयज्ञ कथा कार्यक्रम नियोजन बैठकीसाठी जगदीश शिगची, विजय देशपांडे, रवींद्र विद्वत, देविदास नष्टे, संजय तनपुरे, गंधेकाका, शशिकांत कुलकर्णी, पत्रकार दिनेश मडके, नितीश देवी, माजी नगरसेविका संगीता खाटेर, मनिषा मसलेकर, सुनिता चिवटे, प्रभावती चिवटे, छाया सोरटे, शोभा पुराणिक, मंगल पुराणिक, वर्षा गायकवाड आदीजण उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न करण्यासाठी संयोजन समितीची लवकरच निवड करण्यात येणार असून भाविकांनी भागवत ज्ञानयज्ञ सोहळ्यात सहभागी होऊन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे; असे आवाहन यजमान श्रेणिकशेठ खाटेर यांनी केले आहे.

# सेवानिवृत्त कर्मचारी संघाची ५ डिसेंबरला सहविचार सभा

करमाळा(सं.प्र.): सेवानिवृत्त कर्मचारी संघ करमाळा या संघाची सहविचार सभा ५ डिसेंबर रोजी श्री स्वामी समर्थ मंदिर, फंडगल्ली, करमाळा येथे दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आली आहे. या सभेत हयातीचे दाखले, निवडश्रेणी प्रस्ताव, संगणक वसुली रकमा याबाबत प्रस्ताव दाखल करणे याविषयी चर्चा करण्यात येणार आहे. तरी सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी या सहविचार सभेला उपस्थित रहावे; असे आवाहन संघाचे सचिव नारायण घोलप यांनी केले आहे.

विघ्नहर्ता इंटिरीयर
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051
करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
देवी प्लायवुड ॲन्ड हार्डवेअर
• प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
• हार्डवेअर • फेव्हिकॉल • वुडन फ्लोरिंग • सनमायका
प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर



आपल्या लाडक्या
मुला-मुलींच्या वाढदिवसानिमित्त
आकर्षक रिमोट कंट्रोल इलेक्ट्रीक थार (जीप) भेट द्या !
आजच आपली गाडी बुकींग करून डिस्काउंटचा लाभ घ्या !
पत्ता : श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा.
(9822058106, 7798307085)

# राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत आश्लेषा बागडे हिने पटकाविले सुवर्णपदक



करमाळा(सं.प्र.): विद्या विकास मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील विद्यार्थीनी आश्लेषा बागडे हिने वरीष्ठ राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत विविध महिला मल्लांना चितपट करीत अंतिम फेरीत प्रवेश करून विजय प्राप्त करून सुवर्णपदक पटकाविले. या स्पर्धेत ५७ किलो वजन गटामध्ये तिने प्रथम क्रमांक पटकावून वरीष्ठ राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी तिची निवड झाली. आश्लेषा बागडे ही विहाळ येथील बागडे सर यांची कन्या असून यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात बी.ए.भाग २ मध्ये शिकत आहे. वरीष्ठ राष्ट्रीय कुस्ती स्पर्धा ६ ते ८ डिसेंबर रोजी कर्नाटक राज्यातील बेंगलोर येथे होणार असून ५७ किलो वजन गटामध्ये आश्लेषा बागडे ही महाराष्ट्र तर्फे नेतृत्व करणार आहे. तिला महाविद्यालयाचे शारिरीक शिक्षण शिक्षक प्रा.राम काळे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे सचिव विलासराव घुमरे, अध्यक्ष प्राचार्य मिलींद फंड, सहसचिव विक्रम सुर्यवंशी, प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, वरीष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ.अनिल साळुंखे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक तसेच सर्व प्राध्यापक व कर्मचारी वृंद यांनी आश्लेषा बागडे हिचे अभिनंदन केले.

मस्कर ॲग्रो सर्व्हिसेस
व
सर्व सेवा केंद्र
मस्कर ट्रेडिंग कंपनी
आयडोल ठिबक व तुषार सिंचन, पारस गोल्ड
धानुका, तेजस, स्वस्तिक पाईप, मर्सिबल, सबमर्सिबल पंप, मल्चींग पेपर, प्लंबींग हार्डवेअर मटेरियल व शेतीपयोगी साहित्य योग्य दरात मिळेल.
बायपास चौक, उड्डाण पुला जवळ, कमलादेवी रोड, करमाळा.
प्रोप्रा : कैलास काशिनाथ मस्कर, मो.9921325558, 9767655558

## यश कलेक्शन तर्फे आयोजित दिवाळी डबल धमाका योजनेतील
# विजेत्यांना अभिनेत्री माधुरी पवार यांचे हस्ते बक्षीस वितरण




करमाळा(सं.प्र.): करमाळा शहरातील नामवंत कापड दुकान यश कलेक्शन यांनी दिपावली निमित्त ग्राहकांसाठी दिवाळी डबल धमाका कोण होणार भाग्यवान विजेता हा उपक्रम राबविण्यात आला. या योजनेतील बक्षिस वितरणाचा कार्यक्रम २६ नोव्हेंबर रोजी संपन्न झाला. अभिनेत्री माधुरी पवार यांचे हस्ते प्रथम क्रमांकाचे बक्षीस हिरोस्पेलंडर व होंडा डेस्टिनी ही बक्षीसे नेहा आलाट व आदित्य सुर्यवंशी यांना देण्यात आले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांचे व ग्राहकांचे स्वागत यश कलेक्शनचे मालक राजकुमार दोशी, यश दोशी, प्रतिक दोशी यांनी केले. यावेळी पोलीस निरीक्षक विनोद घुगे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच करमाळा शहर व तालुक्यातील ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होता. दिवाळी डबल धमाका या उपक्रमास ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिल्याबद्दल यश कलेक्शनचे मालक राजकुमार दोशी, यशराज दोशी, प्रतिक दोशी यांनी सर्वांचे आभार मानले व दोशी परिवाराने भाग्यवान विजेत्यांचे अभिनंदन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी यश कलेक्शन मधील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### दिवाळी डबल धमाका उपक्रमातील बक्षीसाचे मानकरी..

**स्प्लेंडर/डेस्टिनी गाडी :** नेहा आलाट, आदित्य सुर्यवंशी

**फ्रिज :** गहिणीनाथ गायकवाड, विशाल वाघमोडे, गहिणीनाथ क्षीरसागर

**मोबाईल :** सत्यवान घुगे, अशपाक तांबोळी श्रीकांत दमाले, किस्किंदा लावंड.

**एलईडी टिव्ही :** गणेश नलावडे, आकाश कुरकुटे, अमोल साबळे, शुभम जगदाळे, कृष्णा हांडे.

**कुलर :** सूरज शिनलोट, अक्षय डोंगरे, रेवती परदेशी, शुभम पाटील, भारत गवळी साहेबराव भांडवलकर.

# सामुदायिक बुध्द वंदना घेऊन संविधान दिन साजरा



करमाळा(सं.प्र.): येथील विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकामध्ये सामुदायिक बुध्द वंदना घेऊन ७४ वा संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी शेतकरी कामगार संघर्ष समितीचे संस्थापक व सोलापूर जिल्हा अध्यक्ष दशरथ कांबळे, आदिनाथ कारखान्याचे माजी व्हा.चेअरमन रमेश कांबळे, दलित सेनेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण भोसले, करमाळा अर्बन बँकेचे मॅनेजर एस.पी.कांबळे, पाटबंधारे विभागाचे उपअभियंता गौतम कांबळे, किसन जानराव, प्रमोद गायकवाड, भीमराव कांबळे, एल.यु.कांबळे, सुनील खरात, संतोष कांबळे, अनिकेत अडसुळ तसेच सर्व केंद्रीय शिक्षिका, उपासक, उपासिका यावेळी उपस्थित होते. केंद्रिय शिक्षिका शोभाताई कांबळे यांनी संविधानावर मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम भारतीय बौध्द महासभा शाखा करमाळा तालुका अध्यक्ष बौध्दाचार्य प्रशांत कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

खुशखबर खुशखबर
मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको औरंगाबाद(२०८ किमी), नको मिरज (२३० किमी), आता आपल्या करमाळा (१/२ किमी) शहरात
**डॉ.लोकरे हॉस्पिटल** मध्ये **सोमवार** व **गुरूवारी उपलब्ध**
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
**डॉ.विकास देविदास नागरगोजे** (एम.एस.मुंबई)
उपलब्ध सुविधा...
• मुळव्याधवर इंजेक्शन • डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब • एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब • संडासवाटे रक्त येणे, पु येणे • संडासची जागा बाहेर पडणे • संडास जागी खाज व आग होणे • संडासाचा नागवेडा • संडास नंतर बसण्यास त्रास होणे • भगंदर, फिशर • चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)
ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)
परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई

ओपीडीचे वैशिष्ट्ये...
• इंजेक्शन सुविधा • लेझर सुविधा
• प्रभावी औषधी सुविधा • मुळव्याधी आवश्यक ड्रेसिंग
• मेडिक्लेम सुविधा उपलब्ध • पार्किंगची व्यवस्था
• आठवड्यातून दोनदा ओपीडी
विशेष सुचना... १. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल. २. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे. ३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील. ४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य. ५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
नाव नोंदणीसाठी संपर्क
मो.9763035862
बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

# पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयात संविधान दिन साजरा



करमाळा(सं.प्र.): पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय रावगाव येथे भारतीय संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढून संविधानाविषयी जागृती केली. यानिमित्त शाळेमध्ये वक्तृत्व स्पर्धा, संविधान दिन पोस्टर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील वीरगती प्राप्त झालेल्या शहिदांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे ज्येष्ठ शिक्षक भाऊसाहेब सरडे होते. यावेळी संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व संविधानाच्या प्रतीचे पूजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थी आणि शिक्षकांनी शपथ घेऊन भारतीय राज्यघटनेशी असलेल्या त्यांच्या बांधिलकीला दुजोरा दिला. विद्यार्थ्यांना संविधानाचे पालन करण्याचे आणि महान देशाचे नागरीक असल्याचा अभिमान बाळगण्याचे आवाहन करण्यात आले.

शिक्षक किरण परदेशी यांनी भारतीय संविधानाविषयी माहिती सांगताना प्रत्येक भारतीय नागरीकाने संविधानाप्रती आदर आणि निष्ठा ठेवून वागले पाहिजे. घटनेतील तत्वाप्रमाणे वागलो तर निश्चितच देशाचा व्यवहार चोख होईल. राज्यघटना ही एक जिवंत दस्ताऐवज असल्याचे मत व्यक्त केले. याप्रसंगी हनुमंत रासकर, प्रताप बरडे, अंजली लांडगे, सुहास कानगुडे आदी शिक्षकांसह विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचालन विद्यार्थीनी प्रतिक्षा बरडे हिने केले तर श्रावणी वारे हिने आभार मानले.

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स • प्लंबींग • हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.



युवा नेते
देशभक्त
मा.उपनगराध्यक्ष
मा.नगराध्यक्ष
माजी आमदार
करमाळा तालुका एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त
करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक
खरेदी-विक्री संघाचे चेअरमन व जगताप गटाचे युवा नेते
मा.श्री.शंभुराजे जगताप
यांना २ डिसेंबर रोजी असलेल्या वाढदिवसास
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
महात्मा गांधी ज्यु.कॉलेज ऑफ सायन्स, करमाळा.
श्री.बी.के.पाटील (प्राचार्य)
श्री.ए.एच.बागवान (उप-प्राचार्य)
सौ.सुनिता नवले (पर्यवेक्षिका)
श्री.आर.एल.भोसले (पर्यवेक्षक)
प्रा.व्ही.एल.पवार (विभागप्रमुख)
प्रा.यु.डी.पाटोळे, प्रा.एस.बी.कन्हेरे, प्रा.पी.ई.सागडे, प्रा.एम.पी.झालटे
प्रा.सौ.एस.ए.बुद्रूक, प्रा.डी.बी.भागडे, प्रा.एस.एन.नलवडे, प्रा.जे.एन.चौरे, प्रा.एम.पी.थोरात, प्रा.पी.जे.जाधव
प्रा.बी.एस.इबितदार, प्रा.एच.ए.निंबाळकर, प्रा.डी.पी.लावंड, प्रा.संग्राम दयाळ, प्रा.एस.बी.जाधव
प्रा.के.जी.कुसकर, प्रा.एम.डी.पाटोळे, सौ.एस.बी.घळके, प्रा.डी.के.दळवे, एम.बी.चोरगे (प्रयोगशाळा परिचारक)




आशिर्वाद
श्री आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक
ॲड.दत्तात्रय महादेव सोनवणे
आपणांस ४ डिसेंबर रोजी असलेल्या
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...
संचालक, मकाई कारखाना
श्री.सचिन अरूण पिसाळ
अध्यक्ष, श्रीराम तरूण मंडळ
श्री.ज्योतीराम अशोक गाडे-पाटील
शुभेच्छुक
• सरपंच ग्रामपंचायत पांगरे सर्व सदस्य व ग्रामस्थ • श्रीराम तरूण मंडळ, पांगरे
• श्रीराम स्वयंसहाय्यता बचत गट, पांगरे ता.करमाळा.

आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...



# जय बजरंगबली टूर्स & ट्रॅव्हल्स् पोंधवडी, ता.करमाळा.

• **नेपाळ दर्शन** (रेल्वे प्रवास ३ एसी) वाराणसी, गोरखपूर, प्रयागराज, काठमांडू, मनोकामना, लुंबिनी, अयोध्या, पोखरा

• **काशी दर्शन** काशी, गया, आयोध्या, प्रयाग

• **गुजरात दर्शन** गिरनार पर्वत, जुनागड, सोरटी सोमनाथ नागेश्वर ज्योर्तिलिंग, द्वारकाधाम, अक्षरधाम, स्टेचु ऑफ युनिटी, सरदार वल्लभभाई पटेल पुतळा
कालावधी : दि.३/१/२०२५ ते ११/१/२०२५
सहल खर्च : रू.१४,०००

• **कन्याकुमारी दर्शन** कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्, तिरूपती बालाजी
कालावधी : दि.१६/१/२०२५ ते २६/१/२०२५
सहल खर्च : रू.१३,८००

• **गंगासागर दर्शन** गंगासागर, कोलकत्ता, जगन्नाथ पुरी भुवनेश्वर, कोणार्क, साक्षी गोपाळ
कालावधी : दि.३०/१/२०२५ ते ७/२/२०२५
सहल खर्च : रू.१२,८००

• **केरळ दर्शन** (रेल्वे प्रवास ३ एसी) कोचीन, अलेप्पी, थेकड्डी, मुन्नार त्रिवेंद्रम, कन्याकुमारी, मधुराई, रामेश्वरम्
कालावधी : दि.११/२/२०२५ ते २३/२/२०२५
सहल खर्च : रू.३१,५००

• **वैष्णोदेवी, काश्मिर, अमृतसर दर्शन** माता वैष्णोदेवी, श्रीनगर, गुलमर्ग, सोनमर्ग, पेहलगाम, अमृतसर इ.
कालावधी : दि.२८/२/२०२५ ते १३/३/२०२५
सहल खर्च रू.२६,०००

• **वैष्णोदेवी दर्शन** माता वैष्णोदेवी, शिवखोरी, जम्मू अमृतसर, अटारी बॉर्डर, दिल्ली
कालावधी : दि.९/३/२०२५ ते १७/३/२०२५
सहल खर्च : रू.१३,८००

• **मथुरा दर्शन** मथुरा, आग्रा, गोकुळ, वृंदावन, बरसाना, गोवर्धन पर्वत, नंदगाव
कालावधी : दि.२२/३/२०२५ ते २८/३/२०२५
सहल खर्च : रू.९,१००

• रेल्वे प्रवास • बस प्रवास
• भोजन व्यवस्था • राहण्याची उत्तम सोय





संपर्क श्री.मयुर राऊत
बुकींग सुरू
मो.८८८८३३३६३८ / ८६९८३३३६३८

प्रा.रामदास झोळ सर फाऊंडेशनच्या माध्यमातून

# समाजकारण व राजकारणात कायम कार्यरत राहणार : प्रा.झोळ




करमाळा(सं.प्र.) : तालुक्यातील जनता आपल्या पाठीशी खंबीरपणे उभी असून, तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येक गावामध्ये प्रा.रामदास झोळ सर फाऊंडेशनच्या माध्यमातून समाजकारण व राजकारणात कायम कार्यरत राहणार; असे प्रतिपादन प्रा.रामदास झोळ यांनी केले.

करमाळा विधानसभा निवडणुकीनंतर आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक कार्यकर्ता विचारविनिमय बैठकीत प्रा.झोळ बोलत होते. प्रा.रामदास झोळ यांच्या संपर्क कार्यालय, विकासनगर करमाळा येथे ही बैठक संपन्न झाली. या बैठकीस शेतकरी कामगार संघर्ष समितीचे अध्यक्ष दशरथ कांबळे, कॉंग्रेसचे हरिभाऊ मंगवडे, ओबीसी कॉंग्रेस तालुका अध्यक्ष गफूर शेख, तालुका उपाध्यक्ष आनंद झोळ, दत्तकला शिक्षण संस्थेच्या सचिव माया झोळ, पोलीस मित्र संघटनेचे तालुका अध्यक्ष संभाजी शिंदे, वाशिंबेचे माजी सरपंच भगवान डोंबाळे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष रविंद्र गोडगे, गणेश मंगवडे, तालुका उपाध्यक्ष सुहास काळे-पाटील, संजय जगताप, श्रीकांत साखरे-पाटील, भिमराव ननवरे यांचेसह माढा तालुक्यातील कार्यकर्ते उपस्थित होते.

पुढे बोलताना प्रा.झोळ म्हणाले, की करमाळा ही आपली जन्मभुमी असून त्याचे ऋण फेडण्यासाठी तसेच बारामती, पुणे, इंदापूर या शहराप्रमाणे करमाळा तालुक्याचा विकास करण्यासाठी आपण कटीबध्द आहोत. संवैधिनिक पदांच्या माध्यमातून तालुक्यातील रस्ते, पाणी, वीज याचबरोबर शिक्षण, आरोग्याच्या समस्या सोडवण्यासाठीआपण विधानसभेची निवडणूक लढवली. जरी आपला पराभव झाला असलातरी परिवर्तनाच्या या लढाईमध्ये शेतकरी, सर्वसामान्य नागरीक, युवक, महिलांचा मिळालेला पाठींबा नक्कीच मला बळ देणार आहे. जनतेच्या कल्याणासाठी आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, नगरपालिका निवडणुका लढविणार असून, गावागावामध्ये शाखा काढून, कार्यकर्त्यांना त्यामध्ये सहभागी करून समाजकारणातून राजकारण करण्याचा मानस असल्याचे प्रा.झोळ यांनी सांगितले. अपयश ही यशाची पहिली पायरी आहे. कमी कालावधीमध्ये जनतेचे भरभरून प्रेम मिळाले. शेतकरी हितासाठी आंदोलनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना ऊस बिल मिळवून दिले आहे. गावागावात टॅंकरने पाणीपुरवठा, बाकडे वाटप, विद्यार्थ्यांना शैक्षणिक पॅड वाटप, नवरात्रा भक्तांना मोफत देवदर्शन यात्रा, मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनास पाठबळ देण्यासाठी चारचाकी गाड्यांना इंधन देण्याचे काम सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून केले आहे. करमाळा तालुक्यातील ११८ गावे, माढा तालुक्यातील ३६ गावे यांनी केलेले प्रेम, स्वागत नक्कीच प्रेरणादायी असून कार्यकर्त्यांनी हिम्मत न हरता नवीन वर्षात संकल्प करून गाव तिथे आपला माणूस, आपले विचार पोहोचवण्यासाठी कार्यरत रहावे; असेही प्रा.झोळ यांनी सांगितले.

यावेळी दशरथ कांबळे म्हणाले, की करमाळा तालुक्यात प्रा.रामदास झोळ सर फाऊंडेशनच्या माध्यमातून शाखा काढून, गावागावात कार्यकर्त्यांचे संघटन उभा करून त्यांना पाठबळ देऊन करमाळा तालुक्याच्या राजकारणात सक्रिय सहभाग घेऊन तालुक्याच्या विकासासाठी काम करणार असल्याचे सांगितले. प्रास्ताविक श्रीकांत साखरे-पाटील यांनी केले. सुत्रसंचालन गोपीनाथ पाटील यांनी केले तर उपस्थितांचे आभार शेतकरी संघटनेचे गणेश मंगवडे यांनी मानले.



# प्रियंका आय केअर हॉस्पीटल



पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600

उपलब्ध सुविधा... **डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र**

- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर • नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
- लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
- एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री

**डॉ.डी.बी.केमकर**
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन

अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)

**आदिका मेडिकल**, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर


युवक नेते
माजी सभापती, पं.स.
लोकनियुक्त सरपंच
करमाळा-माढा विधानसभा निवडणुकीत
मा.श्री.नारायण(आबा) पाटील
विक्रमी मताधिक्याने विजयी झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन
माजी सरपंच, ग्रा.पं.जेऊर
शुभेच्छुक
• श्री.भारत साळवे
• सौ.संगीता भारत साळवे [माजी सरपंच]
जेऊर, ता.करमाळा, जि.सोलापूर


युवा नेते
देशभक्त
मा.नगराध्यक्ष
मा.उपनगराध्यक्ष
मा.आमदार
करमाळा तालुका एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त
खरेदी-विक्री संघाचे चेअरमन,
करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक
मा.श्री.
शंभुराजे जगताप
आपणांस वाढदिवसाच्या लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा..
2 डिसेंबर
प्राचार्य
श्री.बी.के.पाटील
उपप्राचार्य
श्री.ए.एच.बागवान
पर्यवेक्षक
सौ.सुनिता नवले
पर्यवेक्षक
श्री.आर.एल.भोसले
उच्च माध्य. विभागप्रमुख
श्री.व्ही.एल. पवार
शुभेच्छुक
महात्मा गांधी माध्य., उच्च माध्यमिक व तांत्रिक विद्यालय, करमाळा.
सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थीनी


८ वे
दि.४/१२/२०२४
पुण्यस्मरण
मनी होता साधेपणा..
कधी न दाखविला मोठेपणा !
चंदनापरि देह झिजविला..
कष्टातून वसंत फुलविला !
उरली नाही साथ आम्हाला..
आठवण येते क्षणाक्षणाला !
८ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त
आपल्या पवित्र स्मृतीस..
भावपूर्ण आदरांजली
स्व.सोमनाथ उर्फ वसंत दत्तात्रय देवडीकर
(जन्म दि.२६/५/१९५८, मृत्यू दि.४/१२/२०१६)
(सेवानिवृत्त बँक ऑफिसर, दि करमाळा अर्बन बँक)
अभिवादक
श्री.मुकूंद दत्तात्रय देवडीकर व परिवार तेली गल्ली, करमाळा.

# म.गांधी विद्यालयातील १९८७ च्या दहावी अ बॅच मधील विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न





करमाळा(सं.प्र.): येथील महात्मा गांधी विद्यालयातील १९८७ च्या दहावी अ बॅच मधील विद्यार्थ्यांचा गेट टुगेदर स्नेहमेळावा नुकताच संपन्न झाला. ३८ वर्षानंतर जुने शाळेतील बाल मित्र, सवंगडी एकत्र आले. यामध्ये २७ विद्यार्थी-विद्यार्थीनी सहभागी होत उत्स्फुर्तपणे सर्वांनी एकमेकांचे स्वागत केले. दूर गावाहून आलेल्या बॅचमेटची उपस्थिती विलक्षण होती. ९ नोव्हेंबरला सायंकाळी करमाळा येथील नियोजित हॉल यशकल्याणी सेवाभवन येथे सर्वांनी चहा, कॉफी, स्नॅक्स सोबत एकमेकांचे स्वागत केले. सायंकाळी पाच ते रात्री दहा पर्यंत विविध कार्यक्रमांनी ओळख, श्रध्दांजली, गाणे, जोक, स्वागते, अनुभव कथन, जुन्या आठवणींना उजा देत खुल्या मनाने दिलाने मोकळे होऊन सारे काही व्यक्त करण्याची मजा घेत मजेदार खेळ, गेम्स सह अंताक्षरीने शेवट करत पुन्हा त्या शालेय क्षणांची धमाल अनुभवली. सोबत एकत्र जेवणाची मजाही आली. दुसऱ्या दिवशी सकाळी चहा, कॉफी, नाष्ट एकत्र घेत कमलाभवानी देवी दर्शन मंदिर परिसर, सात विहिर भेट देवून एकत्रीत फोटो सेशन झाले. सकाळी दहा नंतर महात्मा गांधी विद्यालयास भेट दिली. यावेळी दहावी अ वर्ग मिळालेनंतर आपआपल्या बेंचवर बसून एकमेकांचे क्लास घेतले. सामुहिक प्रार्थना, राष्ट्रगीतही झाले. नवीन प्रकारचे गेम्सही घेण्यात आले. जिंकणाऱ्या मुला-मुलींना बक्षीसे पण दिली गेली. तेच रम्य बालपणीचे शाळेतील दिवसाचा काही काळ अनुभव घेतला. दुपारी एकत्र जेवणानंतर आपआपल्या नियोजनाप्रमाणे जाण्याचे, थांबण्याचे पाहुन पुढील स्नेहमेळाव्याचे अंदाजे नियोजन ठरवून एकमेकांना जड मनाने निरोप दिला. आयुष्यात व्यस्त दिनचार्य असूनही दोन दिवसाचा कार्यक्रम व्यवस्थित व मनोरंजक होऊन आपल्या लहानपणीच्या शालेय जीवनातील रम्य आठवणी जाग्या करून तेच क्षण पुन्हा अनुभवण्यासाठी सगळ्यांनीच उत्स्फुर्त सहभागासोबत कष्ट घेतले प्रयत्न केले. या स्नेहमेळाव्यात अश्विनी दोशी, वंदना निलाखे, वैशाली शहा, गीता देवी, वंदना घोलप, वैशाली महाजन, अंजु किंगर, वंदना पवार, जयश्री माळवे, निर्मला शेंडे, डॉ.प्रमोद कांबळे, डॉ.मनोज काळे, संदेश उबाळे, भीष्माचार्य चांदणे, किरण भुसारे, आजिनाथ घाडगे, आण्णासाहेब पाटील, शशिकांत देवकर, दगडू वाडेकर, प्रविण जगताप, नितीन विधाते सर, शरद कोकीळ, जोतिराम कोकाटे, नागेश कांबळे, संतोष सुंदेचामुथा, डॉ.सिध्दार्थ गायकवाड आदीजण सहभागी झाले होते.

**सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी २०० रू.**

# टिपु सुलतान जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरात टिपु सुलतान यांच्या २७३ व्या जयंती निमित्त रक्तदान शिबीर घेण्यात आले.

या शिबीराचे उद्घाटन तहसीलदार शिल्पा ठोकडे यांचे हस्ते झाले. यावेळी जयंती अध्यक्ष बबलू पठाण, मिरवणूक प्रमुख शाहरूख नालबंद, खजिनदार इरफान सय्यद, राष्ट्रवादी युवकचे अध्यक्ष सोहेल पठाण, शाहरूख पठाण, टिपू सुलतान समितीचे पदाधिकारी सुफरान शेख, अजहर शेख, अन्वर बागवान, अख्तर शेख, आकिब बागवान, अनस बागवान, सनी बादाडे, बाशिद शिकलकर, आरमान शेख, समीर पठाण, साहिल पठाण, दिदार पठाण आदीजण उपस्थित होते. या शिबीरास रक्तदात्यांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला.


## भावपूर्ण श्रध्दांजली



कै.पै.हरिभाऊ बाळकराम रासकर (नाना)
जन्म दि.१/६/१९४५, मृत्यू दि.२३/११/२०२४

कष्टाने केली आयुष्याची सुरूवात..
सगळ्यावर फिरवला मायेचा हात,
सुख जवळ येताच काळाने फिरवली पाठ..
जन्मो जन्मी पाहु आम्ही तुमची वाट !

**कै.पै.हरिभाऊ बाळकराम रासकर (नाना)**
यांच्या स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली !

शोकाकुल

श्री.दयानंद बाळकराम रासकर, श्री.विलास हरिभाऊ रासकर, श्री.बबन आत्माराम रासकर
श्री.भारत दयानंद रासकर, श्री.शंकर काशिनाथ रासकर, श्री.दिगंबर आत्माराम रासकर
श्री.राजेश दयानंद रासकर, श्री.शुभम शंकर रासकर, श्री.मुकुंद सुर्यभान रासकर
श्री.संजय दयानंद रासकर, श्री.अभिषेक शंकर रासकर, श्री.रोहित बबन रासकर
श्री.हेमंत सुर्यभान रासकर, श्री.सोहम विलास रासकर, श्री.समर्थ भारत रासकर
श्री.अथर्व संजय रासकर, श्री.ओम विलास रासकर, श्री.मिलींद सुर्यभान रासकर

**समस्त रासकर परिवार** भवानीपेठ, करमाळा.



## जागा विकणे आहे

करमाळा शहरातील मेनरोड वरील रोडटच (१६ x ३५) दोन मजली बांधकाम असलेली व्यावसायि क जागा विकणे आहे

**संपर्क : मो.नं.9766291552**


हार्दिक अभिनंदन !
चेअरमन
व्हा.चेअरमन
सचिव
श्री.धुळाभाऊ कोकरे
श्री.दत्तात्रय रणसिंग
प्रा.विलास ठोकळ सर
करमाळा-माढा विधानसभा निवडणुकीत
मा.श्री.नारायण(आबा) पाटील
विक्रमी मताधिक्याने विजयी झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
लोकनेते नारायण(आबा) पाटील ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या; जेऊर
संचालक : विलास दिगंबर पाटील, सुलेमान अब्बास मुल्ला, विष्णु भानुदास गुटाळ, शिवाजी सिद्राम गावडे, परेशकुमार प्रविणकुमार दोशी, डॉ.अतुल कांतीलाल लुणावत, चंद्रकांत अर्जुन बोराडे, सौ.वंदना नातू शिंगाडे, रुक्मीणी किसन माने व्यवस्थापक : शेख महंमद सलीम उमर (सर्व सभासद, कर्मचारी व पिग्मी एजंट)


संस्थापक/अध्यक्ष
सचिव
संचालिका
७५ वा वाढदिवस
श्री भैरवनाथ प्रतिष्ठानचे संस्थापक/अध्यक्ष
यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे माजी प्राचार्य
मा.श्री.जयप्रकाश बिले सर
यांना 'अमृतमहोत्सवी'
वाढदिवसानिमित्त...
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
सौ.अमृता परदेशी
मुख्याध्यापिका, जयप्रकाश बिले पब्लिक स्कुल, झरे


देशभक्त
मा.नगराध्यक्ष
मा.उपनगराध्यक्ष
माजी आमदार
2 डिसेंबर
खरेदी-विक्री संघाचे चेअरमन,
करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक
व जगताप गटाचे युवा नेते
मा.श्री.
शंभुराजे जगताप
आपणांस वाढदिवसाच्या लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
श्री भैरवनाथ माध्य. विद्यालय, जातेगाव
मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद

# कार्यकर्त्यांच्या खच्चीकरणामुळे शिंदे यांना सोडले : सुनील(बापू) सावंत



करमाळा(सं.प्र.) : करमाळा विधानसभा मतदारसंघातील माजी आमदार संजयमामा शिंदे हे सन २०१४ ला निवडणुकीला उभे असताना हमाल पंचायतचे संस्थापक व माजी जिल्हा परिषद सदस्य कै.सुभाष(आण्णा) सावंत यांनी त्यांना पाठबळ देऊन निवडणुकीला उभे केले होते. त्यावेळी संजय शिंदे नावाच्या अनेक व्यक्तीमुळे त्यांचा २२०० मतांनी पराभव झाला. त्यानंतरही सावंत गटाने त्यांच्या पाठीशी उभे राहून सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांना विजय मिळवून दिला होता. आमदार झाल्यानंतर कार्यकर्त्यांना जी ताकद द्यायला पाहिजे होती, ती ताकद न देता खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केला. ही बाब आमच्या लक्षात वेळीच आल्याने आम्ही त्यांची साथ सोडून विद्यमान आमदार नारायण पाटील यांना सहकार्य केले व त्यांच्या विजयात महत्वाचा वाटा उचलला आहे; असे सावंत गटाचे युवा नेते सुनील बापू सावंत यांनी सांगितले.

या निवडणुकीच्या संदर्भात ते सावंत गटाची भुमिका विषद करत होते. सावंत गट हा कोणत्याही प्रलोभनाच्या पाठीशी नसतो तर कार्यकर्त्यांच्या भविष्याचा विचार करून निर्णय घेत असतो. आमच्यावर वेगवेगळ्या गावातील व शहरातील सर्वसामान्य कार्यकर्ते जीवापाड प्रेम करतात. त्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने आम्ही राजकारणात योग्य तो निर्णय घेत असतो. माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्याकडून योग्य ते सहकार्य मिळाले नाही; ही बाब आमच्या लक्षात होती. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत आम्ही वेगळा निर्णय घेतला. १५ दिवसात माझ्या सोबत पंचायत समितीचे माजी सदस्य ॲड.राहुल सावंत, माजी नगरसेवक संजय सावंत व आमच्या सहकाऱ्यांनी करमाळा शहर व पांडे जिल्हा परिषद गट पिंजून काढला. आमच्या घरातील लग्न असताना सुध्दा आम्ही त्याचा विचार न करता प्रामाणिकपणे काम केले व त्याचे यश म्हणजे नारायण आबा पाटील यांचा विजय झाला आहे. निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातच शिंदे हे भाजपाचे उमेदवार असून देवेंद्र फडणवीस यांचा त्यांना पाठींबा असल्याची बाब जनतेसमोर आम्ही स्पष्ट केली होती. त्यामुळे आम्हाला निवडणुकीत काम करणे सोपे झाले होते. सावंत गट यापुढेही सर्वसामान्यांच्या सेवेसाठी कार्यरत असणाऱ्या नेत्यासोबत कायम राहणार यात शंका नाही. विद्यमान आमदार पाटील हे सर्वसामान्यातून आलेले व्यक्तीमत्व असून त्यांना सर्वसामान्यांची काळजी आहे; असे मत सावंत यांनी व्यक्त केले

# जेऊर येथे घरासमोर लावलेल्या मोटारसायकलची चोरी

करमाळा(सं.प्र.) : घरासमोर हॅन्डल लॉक करून लावलेल्या मोटारसायकलची चोरी झाली आहे. हा प्रकार १६ नोव्हेंबरच्या रात्री जेऊर येथे घडला आहे. या प्रकरणी राहुल गोपाळ श्रीरामे रा.जेऊर यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की मी हिरोहोंडा ही मोटारसायकल २०१६ मध्ये खरेदी केली होती. १६ नोव्हेंबरला सायंकाळी नेहमीप्रमाणे मी माझ्या घरासमोर हॅन्डल लॉक करून उभी केली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी पाहिले असता मोटारसायकल आढळून आली नाही. शोधाशोध करूनही मोटारसायकल सापडली नाही. याअर्थी सदरची मोटारसायकल चोरट्यांनी चोरून नेली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलिस निरीक्षक पोपट टिळेकर हे करत आहेत.

# गुळसडी येथे देशी दारू विक्री करणाऱ्यास रंगेहाथ पकडले

करमाळा(सं.प्र.) : गुळसडी येथे रस्त्याच्या कडेला बसून देशी दारू विक्री करणाऱ्यास पोलीसांनी रंगेहाथ पकडले असून त्याच्याकडून ८४० रूपयाच्या १२ बाटल्या जप्त केल्या आहेत. हा प्रकार २९ नोव्हेंबरला दुपारी दोन वाजता घडला आहे. या प्रकरणी पोलिस नाईक मयुर हज्रू गव्हाणे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की गुळसडी येथे देशी दारू विक्री होत असल्याची माहिती समजल्यावर २९ नोव्हेंबरला दुपारी दोन वाजता गुळसडी येथे गेलो असता, तेथे सचिन हरिदास कळसे (रा.गुळसडी) हा रस्त्याच्या कडेला पांढऱ्या रंगाच्या प्लॅस्टिकच्या पिशवीत संत्रा देशी दारूच्या १२ बाटल्या ठेवून बेकायदेशीर दारू विक्री करत असल्याचे आढळून आले. त्याच्याकडून ८४० रूपयाच्या सदरच्या बाटल्या जप्त केल्या आहेत.

# भाळवणी येथे २० लिटर हातभट्टी दारू जप्त

करमाळा(सं.प्र.) : भाळवणी येथे घराच्या मागे बसून हातभट्टी दारू विक्री करणाऱ्या महिलेस पोलीसांनी रंगेहाथ पकडले आहे. तिच्याकडून दोन हजार रूपयाची २० लिटर हातभट्टी दारू जप्त केली आहे. हा प्रकार २९ नोव्हेंबरला दुपारी साडेचार वाजता घडला आहे. या प्रकरणी पोलिस कॉन्स्टेबल शेखर शहाजी बागल यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की भाळवणी येथे हातभट्टी दारू विक्री होत असल्याची माहिती समजल्यावर २९ नोव्हेंबरला दुपारी साडेचार वाजता भाळवणी येथे गेलो असता, तेथे ३३ वर्षाची महिला हातभट्टी दारू विक्री करत असल्याचे आढळून आले. तिच्याकडून दोन हजार रूपयाची २० लिटर दारू जप्त केली आहे.

# एस.टी.तून ७४ हजार रू. किंमतीच्या सोन्याच्या पाटलीची चोरी

करमाळा(सं.प्र.) : करमाळा ते कुर्डूवाडी बसमधून प्रवास करत असलेल्या ७० वर्षाच्या महिलेच्या हातातील ७४ हजार रूपये किंमतीची सोन्याची पाटली चोरीला गेली आहे. हा प्रकार २४ नोव्हेंबरला साडेबारा ते दोनच्या दरम्यान घडला आहे. या प्रकरणी छाया बंडेश पांढरे (रा.सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की मी करमाळा येथून कुर्डूवाडी मार्गे सोलापूरला जात असताना करमाळा ते कुर्डूवाडी या बस प्रवासात माझ्या हातातील ७४ हजार रूपये किंमतीची दोन तोळे सोन्याच्या वजनाची पाटली चोरट्यांनी काढून घेतली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक पोपट टिळेकर हे करत आहेत.

करमाळा व परिसरातील त्वचा रूग्णांच्या सेवेसाठी
सोलापूर येथील **त्वचारोग तज्ञ**
**डॉ.संकेत मंडलेचा** MBBS, DDV (Pune)
**प्रत्येक महिन्याचा दुसरा व चौथा शुक्रवारी सकाळी १० ते दु. २ पर्यंत**




**त्वचा विकार :** नायटा/गजकर्ण, इसब, खरूज, काळे डाग, सोरायसिस, पिंपल्स, चाई, कोंडा, स्ट्रेचमार्क, केस गळती, जुनाट खाज, ॲलर्जी, अतिरिक्त घाम येणे, वांग, नागिण, कांजण्या,नखांचे आजार, सुरमा इ.आजारांवर खात्रीशीर उपचार व सल्ला

संपर्क : डॉ.सारंगकर डेंटल क्लिनिक
करमाळा-जेऊर रोड, कॉटेज हॉस्पिटल समोर, करमाळा., जि.सोलापूर
अपॉईंटमेंट : मो.9423333904

**आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर**



रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
- सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण

कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
**श्री कमलादेवी ऑप्टीकल्स** नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

महाराष्ट्रात प्रथमच...



गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय ?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामूक्त व्हा...
आता जून्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !
२ चाकी | ३ चाकी | ४ चाकी | ट्रक | ट्रॅक्टर | JCB | पोक्लेन | सोलर
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
**सुभद्रा पॉवर सोल्युशन्स**
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे (मा.विस्तार अधिकारी, पंचायत समिती, करमाळा) 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

# जनतेच्या कायम संपर्कात राहून जनतेची सेवा करणार : दिग्विजय बागल



करमाळा(सं.प्र.): करमाळा तालुक्यातील जनतेने मतरूपी आशिर्वाद देऊन महायुतीच्या माध्यमातून आपणांस भरभरून मते दिली आहेत. जनतेचे हेच प्रेम, ऋण आपण कायम मनात ठेवून जनतेच्या सुखदु:खामध्ये सहभागी होऊन निरंतर सेवेत राहणार; असे प्रतिपादन शिवसेनेचे युवा नेते दिग्विजय बागल यांनी केले.

शिवसेना-भाजपा महायुतीकडून विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर आयोजित पत्रकार परिषदेत श्री.बागल बोलत होते. यावेळी मार्गदर्शक विलासराव घुमरे, मकाई कारखान्याचे चेअरमन दिनेश भांडवलकर, आदिनाथ कारखान्याचे माजी व्हा.चेअरमन रमेश कांबळे, बाजार समितीचे माजी उपसभापती चिंतामणी जगताप, मकाईचे संचालक रामभाऊ हाके, सतीश नीळ, बाळासाहेब अनारसे, सचिन पिसाळ, सुनील लोखंडे, माजी नगरसेवक राहुल जगताप, बाळासाहेब क्षीरसागर, रंगनाथ शिंदे, युवराज रोकडे आदीजण उपस्थित होते.

पुढे बोलताना दिग्विजय बागल म्हणाले, की करमाळा विधानसभा निवडणुकीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माझ्यासारख्या युवकाला शिवसेनेचे तिकीट देऊन उमेदवारी दिली. २८ दिवसाचा कालखंड असतानाही शिवसेना-भाजपा घटक मित्र पक्षांनी रात्रंदिवस प्रचार यंत्रणा राबवून माझ्यासाठी काम केले. जनतेनेही मला भरभरून प्रेम दिले. रश्मी बागल यांच्या २०१९ च्या पराभवानंतर मागील साडेचार वर्षात जनसंपर्क नसताना आम्ही राजकारणामध्ये पूर्णत: आमची मानसिकता बॅकफुटवर गेली होती. मात्र गेल्या सहा महिन्यातच मार्गदर्शक विलासराव घुमरे यांच्या मार्गदर्शनातून लोकसभेला भाजपमध्ये रश्मी बागल यांचा प्रवेश तसेच शिवसेनेच्या माध्यमातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षाचे पाठबळ मिळाल्यामुळे व स्व.दिगंबरराव बागल मामा यांचा मुलगा म्हणून पहिल्यांदा विधानसभेची निवडणूक लढवून आम्ही तालुक्यामध्ये जनतेच्या विश्वासास पात्र ठरलो आहे. जरी पराभव झाला असलातरी राज्यामध्ये महायुतीचे सरकार असून देशामध्ये आपलेच सरकार असल्याने विकास कामाचे कुठलेही काम आपल्या सरकारच्या सहकार्यातूनच होणार आहे. त्यामुळे मी जनतेच्या कायम संपर्कात राहून जनतेची सेवा करणार आहे. मकाई कारखान्याचे विस्तारीकरण करून कारखाना पूर्ण क्षमतेने चालविण्याचा आमचा मानस आहे. करमाळा तालुक्यातील रस्ते, पाणी, वीज इ. रखडलेली विकासकामे करण्यासाठी प्रयत्नशील राहून रिटेवाडी उपसासिंचन योजना मार्गी लावणे तसेच कुर्डूवाडी बेंदओढ्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण प्रयत्नशील राहणार. तसेच मार्गदर्शक विलासराव घुमरे, रश्मी दिदी बागल यांच्या मार्गदर्शनाखाली येणाऱ्या पाच वर्षात विधानसभेच्या दृष्टीने करमाळा तालुक्यासह माढा तालुक्यातील ३६ गावामध्ये जनसंपर्क वाढवून जनसामान्यांचे काम करणार आहे; असेही श्री.बागल यांनी सांगितले.

यावेळी मार्गदर्शक विलासराव घुमरे म्हणाले, की विधानसभा निवडणुकीत आम्ही जनतेचा कौल स्वीकारला असून जनतेने जी मते दिली त्याबाबत आम्ही समाधानी आहे. आगामी काळात मकाई, आदिनाथ बरोबरच तालुक्यातील प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार यांच्या माध्यमातून कार्यरत राहणार असून दिग्विजय बागल यांना २०२९ला आमदार करण्याचा आमचा संकल्प असून येत्या पाच वर्षात तो पूर्ण करून दाखवणार आहे. आता किंगमेकर अनेक झाले आहेत. मी मार्गदर्शक म्हणूनच काम करून प्रिन्सला आमदार करण्यासाठी कार्यरत राहणार तसेच आमचे लक्ष आगामी जिल्हापरिषद, पंचायत समिती, आदिनाथ, मकाई कारखाना, नगरपालिका, ग्रामपंचायत निवडणूका असून पक्षाच्या माध्यमातून निवडणुका जिंकून पक्ष मजबुतीबरोबरच जनतेला न्याय मिळवून देणार असल्याचेही श्री.घुमरे यांनी सांगितले.

समर्थ बालरूग्णालय स्त्रीरोग व प्रसुतीगृह
डॉ.वृषाली अभिजित हंकारे (M.B.B.S. D.G.O)
डॉ.उदयसिंह नामदेव गायकवाड (M.B.B.S. D.C.H)
उपलब्ध सुविधा.. • गरोदर माता तपासणी व उपचार • सुसज्ज प्रसुतीगृह व ऑपरेशन थिएटर • नॉर्मल आणि अति जोखमीची बाळंतपणे • मासिक पाळीचे आजार निदान व उपचार • वंध्यत्व निवारण • सिझेरियन प्रसुती • गर्भशयाचे आजार निदान व उपचार • मेनोपॉज क्लिनिक
महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत गरीब व गरजू रूग्णांसाठी ठराविक गंभीर आजारावर मोफत उपचार (MJPJAY)
• नवजात अर्भक अतिदक्षता विभाग (NICU) • व्हेंटिलेटरची सोय
• बालरोग अतिदक्षता विभाग (PICU) • CPAP • Pulsoximeter
• दररोज लसीकरण सुविधा (Vaccination) • वाफेची सोय (Nebulizer)
• बाल दमा निदान व उपचार • सेंट्रल ऑक्सिजनची सोय • 02 Concentrator
गायकवाड चौक, करमाळा. (०२१८२-२२००५७, ९१४६४३०५५०)

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात संविधान दिन साजरा



करमाळा(सं.प्र.) : येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रा.अभिजीत लोंढे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील हे होते. यावेळी प्रा.लोंढे म्हणाले, की भारतीय संविधानामुळे स्वातंत्र्याचा खरा अनुभव आपणांस येत आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिश्रमामुळे संविधानाची निर्मिती झाली. स्वातंत्र्य, समता, बंधुता यामुळे मानवी जीवन सुखी करण्यासाठी बाबासाहेबांमुळे मतदानाचा अधिकार श्रीमंत माणूस ते गरीब माणूस या सर्वांना समान मिळाला; हे सर्व संविधानामुळे झाले ; असे त्यांनी आवर्जुन सांगितले.यावेळी प्राचार्य डॉ.पाटील म्हणाले, की संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांना विविध अधिकार संविधानाच्या माध्यमातून दिले. यावेळी संविधान उद्देशिकेचे वाचन राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्रा.प्रमोद शेटे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.डॉ.वंदना भाग्यवंत यांनी केले. उपस्थितांचे आभार कृष्णा कांबळे यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

श्री गजानन अगरबत्ती
• सुगंधी अगरबत्ती • कापूर
• अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
• विविध कलरची रांगोळी
• सर्व प्रकारचे लोबन,
• सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !

पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

साई स्टील रेलिंग & किचन ट्रॉलीज्
सर्व प्रकारचे स्टील रेलिंग, मेनगेट किचन ट्रॉलीची सर्व कामे खात्रीशीर व वेळेवर करून मिळतील.


प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502
पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.


करमाळा-माढा विधानसभा निवडणुकीत
मा.नारायण(आबा) पाटील
हे विक्रमी मताधिक्याने विजयी झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
धवलक्रांतीचे प्रणेते
माजी उपसरपंच, वीट
शुभेच्छुक
श्री भैरवनाथ दूध उत्पादक सह.संस्था मर्या; वीट
श्री.अभयसिंहराजे राजेंद्रसिंह राजेभोसले (माजी उपसरपंच, वीट)
श्री.अभयसिंह राजेभोसले
श्री.राजेंद्रसिंह राजेभोसले


आमच्या संस्थेचे चेअरमन व युवा नेते
श्री.शंभुराजे जयवंतराव जगताप
यांना दि.२ डिसेंबर रोजी असलेल्या वाढदिवसास
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
करमाळा तालुका खरेदी-विक्री संघ
व्हा.चेअरमन, सर्व संचालक मंडळ, कर्मचारी वृंद
विठ्ठल उमाजी तोरणे (मॅनेजर), दादासाहेब देविदास पुजारी
शिवाजी रामचंद्र काळे व कर्मचारी वृंद


देशभक्त
मा.नगराध्यक्ष
मा.उपनगराध्यक्ष
किंगमेकर/माजी आमदार
खरेदी-विक्री संघाचे चेअरमन
व युवा नेते
श्री.शंभुराजे जगताप
यांना दि.२ डिसेंबर रोजी
असलेल्या वाढदिवसास
हार्दिक शुभेच्छा...
शुभेच्छुक
माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ
ग्रामपंचायत बोरगाव, ता.करमाळा.

# भाजपा शहराध्यक्ष पदी सचिन घोलप यांचे नावाची चर्चा



करमाळा(सं.प्र.): करमाळा भाजपा शहर अध्यक्षपदासाठी सचिन घोलप यांचे नावाची जोरदार चर्चा शहरात रंगू लागली आहे. एवढेच नाहीतर अध्यक्ष पद फिक्स झाले आहे; असे कार्यकर्ते सांगत आहेत.

करमाळा विधानसभा निवडणुकीत भाजपाचे शहराध्यक्ष जगदीश आगरवाल यांनी माजी आमदार संजयमामा शिंदे यांना पाठींबा दिला होता. त्यानंतर भाजपातून आगरवाल यांना पदमुक्त करण्यात आले होते. त्यानंतर या रिक्त झालेल्या पदावर सचिन घोलप यांच्या नावाची जोरदार चर्चा चालू झाली आहे. श्री.घोलप हे माजी नगरसेवक असून ते बागल गटाचे कट्टर समर्थक मानले जातात. बागल गटाच्या नेत्या रश्मी बागल या भाजपात पदावर कार्यरत असल्याने घोलप यांची शहराध्यक्ष पदासाठी वर्णी लागण्याची शक्यता असून तसे त्यांनी जोरदार प्रयत्न चालू केले आहेत. असे असलेतरी भाजपाचे वरीष्ठ नेतेमंडळी काय निर्णय घेतात; याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


याबाबत सचिन घोलप यांचेशी संपर्क साधला असता, त्यांनी चर्चा चालू असल्याचे सांगितले. पण भाजप शहराध्यक्ष पदाबाबत मला व्यक्तीशा कोणतीही कल्पना नाही. याबाबतचा निर्णय आमच्या नेत्या रश्मी बागल जो निर्णय घेतील तो मला अंतिम असेल; असेही घोलप यांनी स्पष्ट केले.

# नारायण पाटील यांचे विजयाने वीट मध्ये जल्लोष

करमाळा(सं.प्र.): करमाळा विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीचे (शरदचंद्र पवार पक्ष) उमेदवार नारायण आबा पाटील हे प्रचंड मताने विजयी झाल्याबद्दल वीट गावामध्ये कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करत एकच जल्लोष केला आहे.

सोलापूर जिल्हा दूध संघाचे माजी संचालक राजेंद्रसिंह राजेभोसले यांनी यावेळेस संजयमामा शिंदे यांना सोडचिठ्ठी देत नारायण पाटील यांना पाठींबा दिला होता. श्री.भोसले जिकडे जातील तिकडे विजय मिळतो; अशा प्रतिक्रिया गावात उमटत आहेत. आमदार पाटील यांचे विजयानंतर वीट गावात गुलालाची उधळण करण्यात आली. या उत्साहात माजी उपसरपंच अभयसिंह राजेभोसले, तात्या जाधव, दिगंबर गाडे, बिभीषण आवटे, डॉ.श्रीराम जाधव, गोवर्धन जाधव, अंकुश जाधव, दिलीप निंबाळकर, हनुमंत ढेरे, सुभाष जाधव, पै.तात्या जाधव, गणेश ढेरे, गणेश जाधव, रेवणनाथ जाधव, केशव चोपडे, प्रकाश ढेरे, गौतम जाधव, बिभिषण ढेरे, नवनाथ जाधव, विशाल गणगे, अनिल ढेरे, शांतीलाल जाधव, हरिश्चंद्र आवटे, दिगंबर राऊत, अशोक राऊत, सतीश निंबाळकर, भारत पठाडे, सतीश पठाडे, पांडूरंग जाधव, पै.प्रल्हाद जाधव, रेवणनाथ जाधव, जालिंदर जाधव, निलेश चांदणे, जगदीश निंबाळकर, आदिंनी जल्लोष करून आनंद व्यक्त केला आहे.

# पै.हरिभाऊ बाळकराम रासकर यांचे निधन



करमाळा(सं.प्र.): भवानीपेठ येथील रहिवाशी हरिभाऊ बाळकराम रासकर यांचे २३ नोव्हेंबर रोजी निधन झाले. हरिभाऊ रासकर हे पैलवान होते. नाना या नावाने त्यांची ओळख होती. अंत्यविधी प्रसंगी सर्व क्षेत्रातील नागरीक उपस्थित होते. दयानंद बाळकराम रासकर यांचे ते बंधू व विलास हरिभाऊ रासकर यांचे ते वडील होते. त्यांच्या जाण्याने नागरीकातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

शुध्द.. स्वच्छ..स्वादिष्ट नी रूचकर..!
चिवटे उपहारगृह

| साऊथ इंडियन | नाष्टा | स्नॅक्स | चाट | स्विट | नमकिन |
|---|---|---|---|---|---|
| इडली सांबर उडीदवडा सांबर उत्तप्पा डोसा | पुरी भाजी मिसळ पाव पोहे/उपमा दहीवडा/शिरा | पावभाजी तवापुलाव सँडविच फिंगर चिप्स | पाणीपुरी स्पे.भेळ रगडा पॅटिस राज कचोरी | पेढा, बर्फी लाडू, जामून मैसुरपाक काजू कतली | फरसान शेव स्पे.चिवडा पापडी |

डेअरी: दही, दुध खवा, पनीर बासुंदी लस्सी
साऊथ इंडियन, नमकिन, नाष्टा, स्वीट, चाट, डेअरी, उपवास पदार्थ मिळतील.
एकवेळ अवश्य भेट द्या..!
राशिनपेठ, करमाळा. मो.९००६९४३००६
कोल्ड्रींक: कोल्डकॉफी ज्युस मिल्कशेक आईस्क्रीम

# नूतन आमदार नारायण आबा पाटील यांच्या कारकिर्दीचा आलेख



- **नांव :** नारायण गोविंदराव पाटील
- **जन्म तारीख :** २३ ऑगस्ट १९६६
- **मुळ गाव :** लव्हे, ता.करमाळा.
- **राजकीय कारकिर्द :** जेऊर (ता.करमाळा)
- **शिक्षण :** इ.९ वी पर्यंत
- **सुरूवातीची कारकिर्द :** पैलवान
- **कुस्ती क्षेत्र :** महाराष्ट्र चॅम्पीयन तीन वेळा, ७४ किलो वजन गटात राष्ट्रीय सुवर्णपदक
- **विवाह :** ३१ मे १९९३ (अत्यंत साध्या पध्दतीने पंढरपूर येथे मठात)
- **पत्नी :** सौ.ज्योती नारायणराव पाटील (माहेर - नजीक पिंपरी, ता.मोहोळ)
- **मुले :** पृथ्वीराज (बी.ए.) जनमतातून जेऊर सरपंच, पवन (एम.बी.ए. )
- **मुलगी :** कु.डॉ.सायली (एम.बी.बी.एस.)
- **छंद :** कुस्ती
- **आवडते जेवण :** मेथीची भाजी, भाकरी
- **आवडते काम :** सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविणे
- **स्वप्नं :** तालुक्यातील बेरोजगारी संपवणे व शेती सुजलाम सुफलाम करणे.
- **राजकीय कारकिर्द :**

१. सन १९९२ : जेऊर ग्रामपंचायतीचे सरपंच
२. सन १९९४ : कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती
३. सन १९९७ : सदस्य - पंचायत समिती करमाळा
४. सन १९९८-९९ : सभापती - पंचायत समिती करमाळा
५. सन १९९९ : राष्ट्रवादी काँग्रेसकडून विधानसभा निवडणूक लढवली.
६. सन २००२ : जिल्हा परिषद सदस्य (वांगी गटातून विक्रमी मताने)
७. सन २००६ : अध्यक्ष, भारत शिक्षण प्रसारक मंडळ, जेऊर
८. सन २००७ : जिल्हापरिषद सदस्य (वांगी गटातून विक्रमी मताने)
९. सन २०१२-१३ : आदिनाथ सह.साखर कारखाना संचालक
१०. सन २०१४ : विधानसभेवर निवड (शिवसेना)
११. सन २०१९ : अपक्ष विधानसभा निवडणूक लढवली (अपयश)
१२. सन २०२४ : राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून विधानसभा निवडणूक लढवून १७०१९ मताने विजयी

# शहीद अशोक कामटे यांचे स्मृतिदिनानिमित्त फळे वाटप



करमाळा(सं.प्र.): २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले पोलीस कमिशनर शहीद अशोक कामटे यांचे स्मृतीदिनानिमित्त करमाळा येथील कुटीर रूग्णालयात रूग्णांना आयोजक डॉ.सुनील अडसुळ यांचे तर्फे फळे वाटप करण्यात आली. यावेळी वैद्यकिय अधिक्षक डॉ.गुंजकर, डॉ.सुनील अडसुळ, सौ.साधना अडसुळ, अविनाश अडसुळ, नागेश कांबळे, वैभव जागते आदी उपस्थित होते. यावेळी कामटे यांचे आठवणींना उजाळा देण्यात आला.






# यश कलेक्शनच्या दिवाळी डबल धमाका ऑफर मधील लकी ड्रॉ विजेत्यांचा बक्षिस वितरणाचा धमाक्यात संपन्न

शुभेच्छुक

यश
कलेक्शन
मेनरोड, करमाळा
सारीज
जय महाराष्ट्र चौक, मेनरोड, करमाळा
YASH
BOMBAY DYEING
9150 31 1008




विजेत्यांचे हार्दिक हार्दिक अभिनंदन.....




**वैशिष्ट्ये**

- बांधकाम – सर्व बांधकाम आरसीसी, कुंभारी वीट व ५३ ग्रेड सिमेंट
- खिडक्या – ग्रेनाईट विंडोसील सह, तीन ट्रॅक, अॅल्युमिनियम, कोटेड, स्लायडींग ● फोरव्हिलर पार्कींग
- जीना – आर.सी.सी. ● स्वतंत्र बोअर ● आकर्षक प्रवेशद्वार ● १००० लिटरची पाण्याची टाकी
- लाईट फिटींग – कन्सील्ड फिटींग, फॅन, बल्ब, ट्युबसह ● वॉटर हिटरसाठी सोलर सिस्टीम
- किचनमध्ये अल्ट्रा अॅक्वा प्युरीफायर ● हॉल, किचन व बेड संपूर्ण पी.ओ.पी. एल.ई.डी. फोक्ससह
- प्रत्येकाला स्वतंत्र कंपाऊंड वॉल, पार्कींग स्टाईलसह ● मुख्य दरवाजा लोखंडी सेफ्टी गेटसह

**2BHK रो बंगलो**
मोजकेच शिल्लक ! आजच संपर्क साधा..!

साईट पत्ता :- मथुरानगर, एस.टी.कॉलनी शेजारी, करमाळा., जि.सोलापूर. संपर्क : मो.9921309309, 9860147425